CIDCO
WE MAKE CITIES
प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
सिडको
शहरांचे शिल्पकार
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

दि. 31.03.2021

**सिडकोच्या उलवे येथील नागरी आरोग्य केंद्रात 31 मार्च 2021 पासून कोविड-19 लसीकरणास प्रारंभ**

सिडको महामंडळाच्या उलवे येथील नागरी आरोग्य केंद्रात बुधवार दि. 31 मार्च 2021 पासून कोविड-19 विरोधी लसीकरण मोहिमेस प्रारंभ करण्यात आला आहे. आठवड्यातील सोमवार, बुधवार आणि शुक्रवार या तीन दिवशी सकाळी 10.00 ते दुपारी 04.00 या वेळेत, शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार एका सत्रात 50 व्यक्तींना लस देण्यात येणार आहे.

राज्य शासनाच्या निर्देशांनुसार व सिडकोच्या सामाजिक उत्तरदायित्वाचा भाग म्हणून सदर लसीकरण मोहीम सिडकोतर्फे हाती घेण्यात आली आहे. 31 मार्च 2021 पासून उपरोक्त वेळेत आणि दिवशी उलवे येथील नागरी आरोग्य केंद्रात उलवे नोड आणि जवळपासच्या गावांतील नागरिक तसेच सिडको कर्मचाऱ्यांना कोविड-19 विरोधी लस देण्यात येणार आहे. तसेच लस दिल्यानंतर काही दुष्परिणाम जाणवल्यास उपचार करण्यासाठी आवश्यक ती व्यवस्थाही सदर केंद्रावर करण्यात आली आहे. तरी उलवे नोड व जवळपासच्या गावांतील अधिकाधिक नागरिकांनी या लसीकरणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात येत आहे.

---

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क अधिकारी, सिडको**